<u>नियमीत दिवाणी मुकदमा क्र. २४/२०२१</u>

(नियाज सत्तार शेख विरुध्द गफार सत्तार शेख)

<u>:– नि. ३९ खालील आदेश –:</u>

अर्ज व म्हणणे वाचून पाहिले. वादी यांनी सदरचा अर्ज या दाव्यातील प्रतिवादी क्र. १ गफार सत्तार शेख हे दिनांक २६/०९/२०२३ रोजी मयत झालेले असून त्यांना प्रतिवादी क्र. १अ) नजमुन्नीसा गफार शेख, १ब) मैनुद्दीन गफार शेख, १क) आबीदाबी हुसेन खतीब पुर्वाश्रमीची आबीदाबी गफार शेख, १ड) शबीना राजू मुल्ला पुर्वाश्रमीची शबीना गफार शेख, १ई) शाहीदा मोहीन नाईक पुर्वाश्रमीची शहीदा गफार शेख हे कायदेशीर वारस असून त्याचे व्यतिरिक्त प्रतिवादी क्र. १ यांना अन्य कोणीही कायदेशीर वारस नाहीत. वादी हे प्रतिवादीचे क्र. १चे वारस मुदतीत दाखल करीत आहेत. सदरची दुरुस्ती ही फॉर्मल स्वरुपाची असल्याने सदर दुरुस्तीमुळे दाव्याचे मुळ स्वरुपात कोणताही फरक पडणारा नाही. तरी तशी दुरुस्ती या दाव्यात व दाव्याचे रजिस्टरमध्ये होऊन या दाव्याचे काम पुढे चालविण्यात यावे अशी विनंती वादीने केली आहे.

०२. प्रतिवादीतर्फे विधीज्ञ श्री. आर. एस. गव्हाणकर यांनी सदरचे अर्जावर तोंडी युक्तीवाद करुन अर्जास विरोध दर्शविला आहे. त्यांनी अर्जासोबतचे प्रतिज्ञापत्रावरील तारखेत व मजकुरामध्ये खाडाखोड असल्याबाबत युक्तीवाद केला. सबब, सदरचा अर्ज हा अभिलेखावर दाखल करुन घेता येणार नाही असा युक्तीवाद केला.

०३. अभिलेखाचे अवलोकन केले. अर्जदाराने सदरचा दावा, कायम व अज्ञार्थी ताकिदीसाठी दाखल केला आहे. प्रतिवादी क्र. १ हा मयत झाल्याने त्याचे कायदेशीर वारस म्हणून प्रतिवादी क्र. १अ) नजमुन्नीसा गफार शेख, १ब) मैनुद्दीन गफार शेख, १क) आबीदाबी हुसेन खतीब पुर्वाश्रमीची आबीदाबी गफार शेख, १ड)

शबीना राजू मुल्ला पुर्वाश्रमीची शबीना गफार शेख, १ई) शाहीदा मोहीन नाईक पुर्वाश्रमीची शहीदा गफार शेख हे कायदेशीर वारस आहेत. दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश २२ अन्वये *"दाव्यातील वादी किंवा प्रतिवादी मृत्यू पावल्यास आणि दावा दाखल करण्याचा अधिकार टिकून राहिल्यास अशा वादी किंवा प्रतिवादीच्या कायदेशीर प्रतिनिधीस दाव्यामध्ये समाविष्ट करुन घेतले जाते."*

०४. प्रस्तुत दाव्यातील प्रतिवादी क्र. १ हा दिनांक २६/०९/२०२३ रोजी मयत झाला आहे. प्रस्तुतचा दावा, कायम व अज्ञार्थी ताकिदीसाठी दाखल केलेला असल्याने प्रतिवादी क्र. १चे वारस देखील सदर दाव्यातील आवश्यक पक्षकार आहेत. त्यामुळे परिणामकारक हुकूमनामा काढण्यासाठी प्रतिवादीचे वारस दाव्यामध्ये सामील करणे आवश्यक आहे. प्रस्तुतचा अर्ज मुदतीत दाखल करण्यात आलेला आहे. सबब, सदरचा अर्ज मंजुर होण्यास पात्र आहे. करीता, मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**–: <u>आदेश</u> :–**

१. नि. ३९ कडील अर्ज मंजुर करण्यात येत आहेत.

२. वादी यांना मयत प्रतिवादी क्र. १चे कायदेशीर वारस अभिलेखावर दाखल करण्यास व अर्जातील मागणीप्रमाणे दुरुस्ती करण्यास परवानगी देण्यात येत आहे.

३. वादी यांनी सदर आदेशाच्या तारखेपासून १४ दिवसाच्या आत दाव्यात दुरुस्ती करुन दुरुस्त दाव्याची प्रत अभिलेखावर सामील करावी.

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by PAWAN RAMBHAU DHORE
Date: 2024.04.04 11:26:12 +0530

दिनांक– ०२/०४/२०२४ (प.रा.ढोरे )

सह.दिवाणी न्यायाधीश, क. स्तर,

कुडाळ.